महाराष्ट्र शासन
महसूल विभाग
तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, पुरंदर

☎ - 02115-222331 ✉ - tahsilpurandar@gmail.com

क्रमांक विनिश्चिती/एसआर/९५ /२०१९ दिनांक:- ३० /३ /२०१९

विषय:- मौजे सासवड, तालुका पुरंदर येथील सर्व्हे नंबर ६६/२अ/१अ क्षेत्र ३५०० चौ.मी व सर्व्हेक्रमांक ६६/२अ/२ क्षेत्र २३,४०० चौ. मी. असे एकुण एकंदर क्षेत्र २६,९०० चौ.मी या जागेवर तात्पुरते निवासी प्रयोजनार्थ वापरात बदल करणेसाठी नाहरकत दाखला मिळणेबाबत.
श्री श्रीकांत शंकर जोशी व इतर, रा. सासवड, तालुका पुरंदर यांची मागणी.

**सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७ दिनांक २२ डिसेंबर २०१४ प्रमाणे व महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४२ ब**

## नाहरकत प्रमाणपत्र

ज्याअर्थी मौजे सासवड, तालुका पुरंदर येथील सर्व्हे नंबर ६६/२अ/१अ क्षेत्र ३५०० चौ.मी व सर्व्हे क्रमांक ६६/२अ/२ क्षेत्र २३,४०० चौ. मी. असे एकुण एकंदर क्षेत्र २६,९०० चौ.मी या जमिनीचे तात्पुरते निवासी अकृषीक प्रयोजनार्थ वापरात बदल करणेसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत श्री श्रीकांत शंकर जोशी, श्री वसंत केशव जोशी व इतर, रा. सासवड, तालुका पुरंदर जि. पुणे यांनी मागणी केली आहे.

ज्याअर्थी मुख्याधिकारी नगरपरिषद सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक बा.वि./२६१/२०१९, दिनांक २९/१/२०१९ अन्वये तात्पुरता बांधकाम परवाना दिलेला आहे. सदर प्रस्तावालगतची कागदपत्राची तपासणी केलेली असून श्री श्रीकांत शंकर जोशी व इतर यांनी धारण केलेले विषयांकित क्षेत्र भोगवटादार वर्ग-१ चे आहे. अर्जदार यांचेकडून दिनांक ३१/७/२०१९ पर्यंतचा अकृषिक सारा रक्कम.रु. २३,३५०/- व रुपांतरीत कर रक्कम रु. १,१६,७५०/- अशी एकुण रक्कम रु. १,४०,१००/- (अक्षरी रूपये एक लाख चाळीस हजार शंभर फक्त) वसुल करुन ती शासकीय कोषागारात चलन क्र.जीआरएन एमएच ०० १३९८११५१/२०१८-२०१९ दिनांक ३०/३/२०१९ अन्वये भरुन घेण्यात आलेली आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना विषयांकित जागेत तात्पुरते निवासी प्रयोजनासाठी वापरात बदल करणेसाठी नाहरकत प्रमाणपत्र याद्वारे देणेत येत आहे.

(अ. प्र. म्हेत्रे)
तहसिलदार पुरंदर

COLOUR XEROX

प्रति,
१) श्री श्रीकांत शंकर जोशी, रा. सासवड, तालुका पुरंदर, जिल्हा पुणे
२) श्री वसंत केशव जोशी, रा. सासवड, तालुका पुरंदर, जिल्हा पुणे

प्रत:- १) मुख्याधिकारी नगर परिषद सासवड यांचेकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी
२) कामगारतलाठी सासवड,
२/- सदरप्रमाणपत्राची गाव नमुना २ ला नोंद घेऊन प्रतीवर्ष अकृषीक साऱ्याची वसुली करावी.
३) उप अधिक्षक, भुमि अभिलेख पुरंदर, यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी रवाना.